सकाळ
सातारा, शुक्रवार,
१९ फेब्रुवारी २०१६
५

सकाळ

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगाव

## भोसले कॉलेजमध्ये चर्चासत्रास प्रतिसाद

सातारा, ता. १८ : कोरेगाव येथील डी. पी. भोसले कॉलेजमध्ये विविध विषयांवरील राष्ट्रीय चर्चासत्राचे उद्‌घाटन ज्येष्ठ साहित्यिक प्रा. दादासाहेब मोरे यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले. मराठी, हिंदी, अर्थशास्त्र, इंग्रजी या विषयावरील चर्चासत्रांना प्राध्यापक, विद्यार्थ्यांचा प्रतिसाद मिळाला. प्रा. मोरे म्हणाले, ''आपल्या जाती जमातीचे समूह जीवन आत्मकथनातून प्रकट होते. भटक्या विमुक्तांची आत्मकथने म्हणजे त्या समाजाच्या वेदनांचा, कारुण्यपूर्ण जीवनाचा जाहीरनामाच असतो.'' प्राचार्य डॉ. विजयसिंह सावंत यांनी अध्यक्षीय भाषणात मार्गदर्शन केले. लेखिका विमल मोरे, प्राचार्य डॉ. ए. आर. पडोसी (गोवा विद्यापीठ), प्राचार्य डॉ. ए. एस. जाधव (राहुरी), प्राचार्य डॉ. हिंदुराव घरपणकर (आंध्र), प्राचार्य अंकुश बेलवटकर, प्रा. डॉ. एस. बी. बारादर (कर्नाटक) यांनीही मार्गदर्शन केले.